# भरती प्रक्रिया

## जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार अस्थापनेवर खालील पदांची भरती करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| Sr.No | Name of the Post | No. of Post |
|---|---|---|
| 1. | Accountant (लेखापाल) | 01 Post |

विस्तृत जाहिरात अर्जाच्या नमुन्यासह जिल्हा न्यायालय, नंदुरबार अधिकृत संकेतस्थळ

**https://districts.ecourts.gov.in/Nandurbar** वरून दिनांक 27/09/2023 सायंकाळी 05.00 वाजल्यापासून डाउनलोड (Download) करता येईल.

उमेदवारांनी दिलेल्या नमुन्यात नोंदणीकृत डाक पोच पत्राव्दारे किंवा शिघ्र डाक सेवा(स्पीड पोस्ट) पोचपावतीसह किंवा कार्यालयीन कामकाजाची दिवशी सकाळी 10.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत जिल्हा विधी सेवा प्रधिकरण, नंदुरबार येथे ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्यांचे नाव लिफाफ्यावर लिहून अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार यांच्याकडे दिनांक 09/10/2023 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत अथवा त्यापूर्वी पोहाचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

दिनांक : 26 / 09 /2023

आपला विश्वासू

(आर.एस.तिवारी)
अध्यक्ष
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ,तथा प्रमुख जिल्हा व
सत्र न्यायाधीश नंदुरबार

# लेखापाल (Accountant)

## <u>सेवाप्रवेश क्रमसुची</u>

| अ.क्र | दिनांक | प्रक्रिया |
|---|---|---|
| 01 | 27/09/2023 | जहिरात संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिध्दीस देणे. |
| 02 | | अर्ज भरण्याची शेवटची दिनांक 09/10/2023 रोजीच्या 05.00 वाजेपर्यंत भरावेत. |
| 03 | 13/10/2023 | छाननी होवून सुचीबध्द केलेल्या उमेदवारांची सुची संकेत स्थळावर प्रसिध्द करणे. |
| 04 | 19/10/2023 | लेखापाल (Accountant) या पदासाठीच्या पात्र उमेदवारांची इंग्रजी व मराठी भाषेतील संगणकावरील टंकलेखन परिक्षा व लेखी परिक्षा. |
| 05 | 21/10/2023 | इंग्रजी व मराठी टंकलेखन परिक्षेचा निकाल तसेच लेखी परिक्षेचा निकाल. |
| 06 | 30/10/2023 | लेखापाल (Accountant) पदासाठी मुलाखत. |

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार

## (जिल्हा न्यायालय आवार, टोकर तलाव रोड, नंदुरबार)

दुरध्वनी व फॅक्स क्र. 2564/210710, ई.मेल - dlsa.nandurbar@rediffmail.com

जाहिरात दिनांकः 27 सप्टेंबर 2023
अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख 09 ऑक्टोंबर 2023 सायं. 5.00 वाजता

### कंत्राटी आधारावर लेखापाल (Accountant)

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नंदुरबार कार्यालयासाठी खालील नमुद पद भरवयाचे आहे. सदरील नेमणुक पुर्णतः कंत्राटी पध्दतीने असून संबंधीतास कंत्राटीचे कालावधी पूर्ण होण्यापुर्वी केव्हाही कामावरून कमी करता येईल.

**भरती करावयाचे पदे**

| Sr.No | Name of the Post | No. Of Posts |
|---|---|---|
| 1 | Accountant (लेखापाल) | 01 Post |

उमेदवाराने दिलेल्या नमुन्यात नोदंणीकृत डाक पोच पत्राव्दारे (आरपीएडी) किंवा शिघ्र डाक सेवा (स्पीड पोस्ट) पोचपावतीसह किंवा कार्यालयीन कामकाजाची दिवशी सकाळी 10.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नंदुरबार येथे अर्ज करावयाचा आहे. ज्या पदासाठी अर्ज केला आहे. त्याचे नाव लिफाफ्यावर लिहुन अधिक्षक, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार यांच्याकडे दिनांक 09/10/2023 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत अथवा त्यापूर्वी पोहोचतील अशा अंदाजाने आपले अर्ज पाठवावेत.

दिनांक 09 /10/2023 रोजीनंतर प्राप्त झालेले अर्ज अथवा इतर मार्गाने पाठवलेले किंवा लिफाफ्यावर पदाचे नाव नमुद न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

**शैक्षणिक अर्हता :-**

1. अ) उमेदवार कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठातून किमान वाणिज्य शाखेतील पदवीधर असावा तसेच वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
2. **संगणकाचे ज्ञान** - टॅली, एम.एस.सी.आय.टी. , मायक्रोसॉफट एक्सेल तसेच संबंधीत अकाउन्ट सॉफ्टवेअरची माहिती व अनुभव असणे आवश्यक.
3. **टंकलेखन गती** - उमेदवाराचा मराठी टंकलेखनाचा वेग 30 श.प्र.मी. व इंग्रजी टंकलेखनाचा वेग 40 श.प्र.मि. पेक्षा कमी नसावा
4. **कामाचा अनुभव** - कोणत्याही संस्थेत लेखापाल म्हणून तीन वर्षाचा कामाचा अनुभव किंवा उच्च न्यायालय विधी सेवा समिती/ उप-समिती /महाराष्ट्र विधी सेवा प्राधिकरण / जिल्हा विधी सेवा प्राधिकरण / न्यायाधिकरणातील लेखापाल म्हणून दोन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.

## वयोमर्यादा

अ) उमेदवार, सर्वसाधारण प्रवर्गाकरिता 21 वर्षापेक्षा कमी वयाचा आणि 38 वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा आणि अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागासवर्ग किंवा महाराष्ट्र शासनाव्दारे 28/03/2018 रोजी त्यावेळेपुरत्या विनिर्दिष्ट केलेल्या मागासनप्रवर्गाकरीता 43 वर्षापेक्षा जास्त वयाचा नसावा.

ब) शासन निर्णय क्र.एस. आर.व्ही - 1077/3576/1833/16ः अ, दिनांक 23/05/1978 नुसार शारिरिकदृष्टया दिव्यांग व्यक्ती, जर ती अन्यथा योग्य व सदर पदांची कर्तव्य पार पाडण्याकरीता सक्षम असतील तर, त्यांच्या बाबतीत सेवा प्रवेशासाटी विहित केलेली उच्च वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत शिथिल केलेली आहे.

**कराराची वैधता** :- नियुक्तीचा करार 11 महिने वैध असेल.

**करार संपुष्टात आणणे** :- उमेदवाराच्या सेवा त्याच्या / तिच्या कामगिरीचे मुल्यमापन केल्यानंतर कोणतीही सुचना आणि स्पष्टीकरण न देता कोणत्याही वेळी संपुष्टात आणल्या जाऊ शकताता.

**अधिकार** :- सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नंदुरबार यांच्याकडे राखीव आहेत.

<u>उमेदवारांना सुचना :-</u>

1. अर्जाचा नमुना व सोबतच्या प्रमाणपत्राचे नमुने जिल्हा न्यायालय नंदुरबार संकेतस्थळ **https://districts.ecourts.gov.in/Nandurbar** यावर उपलब्ध आहेत.त्या नमुन्यातच अर्ज व सोबतची प्रमाणपत्रे तसेच शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या प्रती सादर कराव्यात.
2. उमेदवाराने त्याचे / तिचे अलीकडचे पासपोर्ट आकाराचे रंगीत छायाचित्र फोटो अर्जावर दिलेल्या जागी लावून त्यावर अशाप्रकारे स्वाक्षरी करावी की त्यातील काही भाग छायाचित्रावर आणि अर्जावर सुध्दा येईल.
3. उमेदवाराने एका सन्मानयीन व्यक्तीची जाहिरातीच्या तारखेनंतर दिलेले चारित्र्याचा दाखला सादर करावा, तसेच त्यांचे विरूध्द कुठल्याही न्यायालयात कुठलाही फौजदारी खटला निकाली / चालू किंवा प्रस्तावित नसल्याचे प्रमाणित करावे. असल्यास त्याचा तपशिल द्यावा.
4. विहीत नमुन्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
5. सदर जाहिरातीत आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार निवड समितीकडे राखून ठेवलेले आहेत.
6. **Accountant** (लेखापाल) या पदासाठी आवश्यक ती संगणकावरील टंकलेखन चाचणी परीक्षा घेण्यात येईल.

   अ) मराठी भाषेतील 20 गुणांच्या टंकलेखन परीक्षेत उमेदवाराला संगणकावरील (30 श.प्र. मि) 07 मिनीटांत 210 शब्द टंकलिखीत करावे लागतील. उमेदवारांनी केलेल्या टंकलेखनाचे मुल्यमापन जिल्हा न्यायालयातील लघुलेखकांच्या मदतीने करून घेतले जाईल.

   ब) इंग्रजी भाषेतील 20 गुणांच्या टंकलेखन परीक्षेत उमेदवाराला संगणकावर 07 मिनीटांत 280 शब्द टंकलिखीत करावे लागतील (40 श.प्र.मि.) उमेदवारांनी केलेल्या टंकलेखनाचे मुल्यमापन जिल्हा न्यायालयातील लघुलेखकांच्या मदतीने करून घेतले जाईल.

   ड)मराठी व इंग्रजी भाषेतील टंकलेखन चाचणी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन करतांना 5 चुकांसाठी 1 गुण कापण्यात येईल. तसेच मजकुर वगळणे ही देखील चुक धरली जाईल.

7. मराठी व इंग्रजी भाषेतील टंकलेखन परिक्षा घेतल्यानंतर उमेदवारांची त्याच दिवशी लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदर परिक्षा ही 40 गुणांची असेल. सदर परिक्षा ही लेखापाल पदासंबंधातील कामकाजाचे ज्ञान, संगनकाचे ज्ञान व सामान्य ज्ञान या विषयाशी निगडीत राहील.

8. जाहिरात मध्ये दिलेल्या पदसंख्येपेक्षा तिप्पट उमेदवारांना, त्यांना इंग्रजी टंकलेखन ,मराठी टंकलेखन आणि लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारावर मौखिक परीक्षेसाठी बोलावले जाईल. जर 1:3 हे प्रमाण राखण्यासाठी शॉर्ट लिस्ट केलेल्या उमेदवारांपैकी शेवटच्या उमेदवाराइतके गुण मिळवणारे एकापेक्षा अधिक उमेदवार असतील, तर अशा सर्व उमेदवारांना मौखिक परीक्षेसाठी बोलाविले जाईल. सदर मुलाखत 20 गुणांची राहील.

9. वयाच्या पडताळणीसाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा शालांत परिक्षेचा दाखला आवश्यक राहील.

10. उमेदवाराला त्याच्या / तिच्या नियुक्तीसाठी मानधन म्हणून प्रति महिना 25000/- एकत्रित रक्कम दिली जाउ शकते आणि तो/ती इतर कोणत्याही भत्यांसाठी पात्र असणार नाही आणि त्याला नियमित नोकरीत मानले जाणार नाही. सदरील नेमणुक पुर्णतः कंत्राटी पध्दतीची राहील.

## <u>मुलाखत</u>

11. ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाण्याची शक्यता आहे. त्यांनी मुलाखतीच्या वेळेस खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती आणि त्यांचे मुळ प्रमाणपत्र सादर करावे.

    1. जन्मतराखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा/ जन्माचा / एस.एस.सी. दाखला)
    2. अर्हता परीक्षा/ पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबाबतचा दाखला.
    3. सन्माननीय व्यक्ती, ज्यांची नावे मुळ अर्जात नमुद केलेली आहे. त्यांनी दिलेला त्याचे/ तिचे चारित्र चांगले असल्याबददलचा चारित्र्याचा दाखला.
    4. लेखापाल म्हणून काम केल्याचा अनुभवाचे प्रमाणपत्र.
    5. अर्हतेच्या रकान्यात नमुद केल्याप्रमाणे, संगणक प्रचालनाचे विहित ज्ञान असल्याबाबतचा विद्यापीठ/ संस्थेने दिलेला दाखला.
    6. इंग्रजी व मराठी टंकलेखनातील आवश्यक वेग असल्याबाबतचा शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र शासन किंवा शासकीय मंडळ किंवा आयटीआय यांनी दिलेला दाखला.
    7. संबंधीत जिल्हा सरकारी रूग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला दिव्यंगत्वाचा दाखला, लागु असल्यास
    8. शासन विहित करेल त्या प्राधिक-याने दिलेला जातीचा दाखला जेथे लागु असेल तेथे.
    9. छोटया लहान कुटुंबाबतचे प्रतिज्ञापत्र नमुना - अ जे जाहिरातीच्या शेवटी उपलब्ध आहे.

12. समितीने असे ठरविले आहे की, निवड करण्यासाठी निम्नतम पात्रता गुण निश्चित करण्यात आले नसतील तेथे असे निम्नतम पात्रता गुण 35 टक्के असावेत.

13. उमेदवारांना चाचणी परीक्षांसाठी निश्चित केलेल्या तारखांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

14. सेवाप्रवेश प्रक्रियेच्या वेळापत्रकात या कार्यालयाचे नियंत्रण नसलेल्या कोणत्याही अकल्पित घटनांच्या घडण्यासापेक्षा बदल होवु शकतो. असा बदल वेळोवेळी कार्यालयाच्या सूचनाफलकावर अधिसुचित करण्यात येईल आणि जिल्हा न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

दिनांक :- 26 / 09/2023

आपला विश्वासू

(आर.एस.तिवारी)

**अध्यक्ष**

**जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ,तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नंदुरबार**

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार
## अंतर्गत

नुकतेच काढलेले
पासपोर्ट साईज फोटो

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नंदुरबार करीता निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात 11 महिने या कालावधीकरीता लेखापाल कंत्राटी आधारावर लेखापाल (**Accountant**) या पदासाठी अर्ज करण्याचा नमुना.

1. अर्जदाराचे संपुर्ण नावं व पत्ताः- ..............................................................

2. जन्म तारीखः- .................../................./.................

3. उमेदवाराचे जाहिरातीच्या दिवशीचे वयः- .......................................

4. आधारकार्ड क्रमांकः- ...................................................................

5. मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडीः- .......................................

6. शैक्षणिक अर्हताः-

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

7. अनुभव -

8. सोबत कागदपत्रांचा स्वयंसाक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

# अर्जदाराचे हमीपत्र

मी, याव्दारे, घोषिती करतो/करते की, माझयाव्दारे दिलेली वरील सर्व माहिती बरोबर आहे आणि जर काही चुकीचे आढळले तर माझी उमेदवारी रदद होईल. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांकः-

उमेदवाराची स्वाक्षरी

## <u>नमुना "अ"</u>

मी श्री/श्रीमती/ कुमारी ---------------------------------------------

श्री ----------------------------------------------यांचा / यांची मुलगा/ मुलगी

वय -----------वर्ष राहणार------------------------------------------------

----------------------- याव्दारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो / करते की,

1. मी ----------------------------- या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे
2. आज रोजी मला -----------------------(संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक 28 मार्च 2005 नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --------आहे (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा)
3. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च 2006 नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईन याची मला जाणीव आहे.

स्थळ :-

दिनांक:- / /

उमेदवाराची स्वाक्षरी

# <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी आवेदक / अर्जदार ---------------------------------------------------

याव्दारे प्रतिज्ञापुर्वक जाहीर करतो/ करते की/ सांगतो/ सांगते की, मला कधीही अटक झालेली नाही तसेच माझे विरूध्द कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित नाही किंवा / तसेच मला कोणत्याही फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवून शिक्षा ठोठावलेली नाही किंवा माझे विरूध्द कुठलाही गुन्हा दाखल नाही.

स्थळ :-

दिनांक:- / /

आवेदकाचे नाव व सही

## <u>नमुना “ब”</u>

## <u>चारित्र्य (वर्तणुक) प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, श्री/ श्रीमती/ कुमारी --------------------------------------

हे / हया ----------------------------- तालुका --------------- जिल्हा------------------

येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील -------------- वर्षापासून ओळखतो. त्यांची वर्तणुक व चारित्र्य चांगले आहे

ते / त्या माझे/ माझ्या नातेवाईक नाहीत.

करिता सदरहू वर्तणुक / चारित्र्य प्रमाणपत्र देण्यात येत आहे/ दिले आहे.

स्थळ :-

दिनांकः- / /

प्रमाणपत्र देणा-याचे नाव, सही व शिक्का

पत्ता---------------------------

------------------------------

------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक--------------------